# फॅसिस्टवाद
# (Faseism)

**प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख,**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा.

# प्रस्तावना

- पहिल्या महायुध्दानंतरच्या काळात इटलीत उदयास आलेली सर्वंकष राजसत्तावादी आधुनिक विचारसरणी
- साम्यवादाचा विरोध करण्यासाठी निर्माण झालेली भांडवलशाहीची प्रतिक्रिया असल्याचा आक्षेप
- लोकशाहीला प्रतिक्रियात्मक आणि एकतंत्री अधिनायकवादाचा पुरस्कार करणारी प्रवृत्ती
- कांही वर्षातच जर्मनी, जपान, स्पेन, पोर्तुगाल, अर्जेंटिना वगैरे देशात झपाट्याने प्रचार
- अमेरिकेतही "सिल्व्हर शर्टस् " नावाने फॅसिस्टवादाचे कांही समर्थक पुढे आले.
- फॅसिस्टवाद, नाझीवाद व सर्वंकषवाद एकत्रच विचार होत असला तरी यात सुक्ष्म भेद

मुसोलिनी म्हणतो, "जर एकोणिसावे शतक हे समाजवाद, उदारमतवाद व लोकशाहीचे असेल, तर विसावे शतक हे सर्वाधिकारवाद, समष्टीवाद व सर्वकषवादाचे युग आहे."

# फॅसिस्टवादाची व्युत्पत्ती व अर्थ

- "फॅसिझम"  या शब्दाची व्युत्पत्ती  रोमन शब्द **फॅसिओ** वरून झाली.
- मूळ शब्दाचा अर्थ "लाकडाच्या जुडीमध्ये बांधलेली कुऱ्हाड" असा होतो.
- हे रोमन साम्राज्याचे बोधचिन्ह होते.
- रोमच्या पोलिसी व न्यायिक अधिसत्तेचे ते प्रतिक होते.
- सर्वंकष विचारप्रणाली आणि आणि पोलिसी राज्य असा फॅसिस्टवादाचा अर्थ होतो.
- प्लेटोच्या समष्टीवादातून मॅकेव्हेली, हॉब्ज, रूसो, हेगेल, नित्से, मार्क्स, सोरेल, विल्यम जेम्स, मोस्का व पारेटो अशी एक विचार पंरपरा निर्माण झाली.

# फॅसिस्टवादाच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

- पहिल्या महायुध्दानंतर इटालीची बिकट सामाजिक-आर्थिक परिस्थिती व अपेक्षाभंग
- साम्यवादाला घाबरलेली इटाली व जर्मनीमधील संरजामशाही
- आक्रमक नेतृत्वाचा उदय
- फॅसिस्ट विचारसरणीचा सामाजिक आधार

# फॅसिस्टवादाचे तत्वज्ञान

- समूहनिष्ठेवर भर
- लोकशाी व साम्यवादाला विरोध
- युध्दखोरवृत्ती व साम्राज्य तृष्णा
- स्पष्ट राजकीय तत्वज्ञानाचा अभाव (तत्वज्ञानात्मक संधीसाधूपणा)

  **फॅसिस्टवादात** मॅकियाव्हेलीचा संधीसाधूपणाचा सिध्दांत, हेगेलचा राजकीय निरंकुशतेचा सिध्दांत, सोरेलचा हिंसक क्रांतीवाद आणि विल्यम जेम्स्‌चा फलप्रामाण्यवाद यांचा संयोग झाला आहे. तर **नाझीवादामध्ये** हेगेलच्या विचाराचे अतिसुलभीकरण, नित्सेच्या विचारांचे ग्राम्य स्वरूप, आणि जेम्सच्या विचाराचे विपर्यस्त आकलन यांचे मिश्रण आढळते.
- आधिकृत विचारसरणी - 'एक पक्ष-एक विचार-एक नेता' हे आधारसुत्र **जर्मन लोकांना जे लाभदायक ठरेल ते सत्य**

- विवेक व बौध्दिक व्यव्हाराशी फारकत
- हिंसाचाराला गौरवाचे स्थान
- पुरूषश्रेष्ठीची कल्पना - अंत:प्रेरणेच्या संश्लेष्णात्मक शक्तीचा उदो उदो
- साध्य साधन विवेक नाही
- श्रेष्ठीजनवादाचा अतिरेक / मुठभर श्रेष्ठींच्या निरंकूश सत्तेचे समर्थन
- मिथक निर्मितीवर भर - प्राचीन रोमची थोरवी, शुध्द आर्यवंश
- राज्यसंस्थेचे सर्वश्रेष्ठत्व - राज्यसंस्थेचा जैविक सिंध्दांत, राज्यासाठीच सारे काही, राज्याविरूध्द कांहीही नाही, राज्याबाहेर काहीही नाही.
- प्रत्येक आर्थिक, नैतिक वा सांस्कृतिक मूल्य हे राष्ट्रीय मूल्य असते. आणि राज्यसंस्था त्या सर्वांचा नीट मेळ घालून त्यांचे नियमन करते. या अर्थाने राज्यसंस्था नैतिक किंवा सर्वंकष असते
- मार्क्सवादी अभ्यासकांच्या मते, उदारमतवादी लोकशाही जशी आत्मसंतुष्ट भांडवलदारांची राज्यपध्दती आहे, तशी फॅसिस्टवाद ही संकटग्रस्त भांडवलदारांची ढाल आहे.

# फॅसिस्टवादाचे मुल्यमापन

**फॅसिस्टवादाचे गुण**

- राष्ट्राची जलद गतीने प्रगती
- राजकीय शिस्त निर्माण होते
- तात्विक मतभेदाचा अभाव
- लष्करी सामर्थ्यात वाढ होते.
- राष्ट्राप्रती जागृती निर्माण होते

**फॅसिस्टवादाचे दोष**

- व्यक्ती विकासास मारक
- आक्रमक धोरणाचा स्वीकार
- राज्यकर्त्या वर्गाची दहशत
- आक्रमक व संकुचित राष्ट्रवाद
- पुरूष श्रेष्ठीची कल्पना
- आंतरराष्ट्रीय शांततेला धोका

# धन्यवाद